**कि.फौ.अर्ज :- १३२/२०१८**
**रिता-वि-रमेश**

**गैरअर्जदारासाठी साक्षीदार क. १**
**नि. २७ प्रमाणे शपथेवर पुढील सरतपास सुरू:-**
**गैरअर्जदारासाठी श्री. एस. के. मानकर वकील साहेब.**

१. मी साक्षीपुराव्यासाठी शपथपत्र दाखल केले आहे. शपथपत्रातील मजकूर माझया सांगण्याप्रमाणे लिहिलेला आहे. तो मजकुर मला वाचुन व समजावुन सांगीतला. त्यावर माझा अंगठा आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. शपथपत्र **नि. २७** वर आहे.

**उलटतपास अर्जदारासाठी श्री. पी. टी. गजबे वकील साहेब.**

**विनंतीवरून तहकुब.**

श्रवणोत्तर स्विकृत

स्वा/-
(सं. दि. वानखेडे)
न्यायदंडाधीकारी प्र. वर्ग,
पारशिवनी.

समक्ष

स्वा/-
(सं. दि. वानखेडे)
न्यायदंडाधीकारी प्र. वर्ग,
पारशिवनी.

दिंनाक :-३१/०१/२०१९.

**उलटतपास अर्जदारासाठी श्री. पी. टी. गजबे वकील साहेब.**

०२. मी लग्नापुर्वी रिताला बघावयास गेलो होतो. त्यावेळी अर्जदार रिताच्या कुटुंबीयांना व नातेवाईकांना मी शेती करतो असे सांगीतले होते. त्यावेळी अर्जदार रिताच्या कुटुंबीयांना वर्षाची साठ हजार रूपये कमवितो असे सांगीतले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी आजही शेती करतो. मी आज रोजी लागली तर मजुरीचे काम गावामध्ये करतो. मला शेतीतील कामे करता येतात. तसेच मी गुरे सांभाळण्याचे काम करतो. आज रोजी मला दर महीना चार ते पाच हजार रूपये मजुरीचे मिळतात. मी लोकांच्या गायी म्हशी चारवित असतो.

DISTRICT COURT NAGPUR

मी पाच ते दहा म्हैस व दोन ते तीन गायी चारत असतो. मला गायी म्हशी चारण्याकरीता २००/- रूपये मजुरी मिळते. मला महीन्यातुन १५ दिवस काम लागते. हे म्हणणे खरे नाही की, मला महीन्याला चार ते पाच हजार रूपये मजुरी मिळत असतांना मी जाणुनबुजुन माझया लेखी उत्तरात व शपथपत्रामध्ये तसा उल्लेख केला नाही. तसा उल्लेख माझया लेखी उत्तरात व शपथपत्रात का करण्यात आल नाही याचे कारण मी सांगु शकत नाही.

०३. मला भरतकाम व शिवणकाम काय असते या बाबत माहीती नाही. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार ही भरतकाम व शिवणकाम करते असे मी शपथपत्रामध्ये खोटे सांगीतले आहे. अर्जदाराला भरतकाम व शिवणकाम येते या बाबतचा कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदाराला भरतकाम व शिवणकाम येत नाही म्हणुन तसा कागदोपत्री पुरावा मी दाखल केला नाही.

०४. लग्नामध्ये अर्जदाराच्या नातेवाईकाकडुन भेटवस्तु आल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदाराला तिच्या लग्नामध्ये तिच्या आई वडीलांनी सोन्याचे दागीने दिले होते. मी लग्नामध्ये अर्जदार रिताला कानातील सोन्याच्या बि-या, गळयातील मंगळसुत्र, सोन्याची लंबी गरसोडी, पायातील चांदीची चैन व जोडवे दिले होते. मी हे दागीने नागपुर येथुन विकत घेतले होते. त्या बाबतच्या पावत्या माझयाकडे आहेत. त्या पावत्या मी न्यायालयात दाखल केल्या नाहीत. त्या पावत्या मी न्यायालयात दाखल करू शकतो.

**उलटतपास विनंतीवरून तहकुब.**

श्रवणोत्तर स्विकृत

स्वा/-
(सं. दि. वानखेडे)
न्यायदंडाधीकारी प्र. वर्ग,
पारशिवनी.

समक्ष

स्वा/-
(सं. दि. वानखेडे)
न्यायदंडाधीकारी प्र. वर्ग,
पारशिवनी.

दिंनाक :-१४/०२/२०१९.

DISTRICT COURT, NAGPUR.